**प्रेस नोट** **दिनांक ०२/०६/२०१९**

## खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

### रिक्षामध्ये विसरलेल्या बॅगेचा शोध घेऊन, बॅग मुळमालकास पतर.

दि. ०१.०६.२०१९ रोजी इसम नामे योगेश रविंद्र प्रभु, वय ३७ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. कोल्हापुर, मो.नं. ९८२२२४३९५४ यांनी फडगेट पोलीस चौकीस येवून कळविले की, ते कामानिमित्त पुणे येथे आले होते. स्वारगेट तेथुन मंडईकडे रिक्षाने येत असताना, त्यांची बॅग ज्यामध्ये एक लॅपटॉप व महत्वाची कागदपत्रे आहेत, ती सदर रिक्षामध्ये विसरलेली आहे. त्या अनुषंगाने फडगेट मार्शलवरील कर्मचारी पो.ना. ७७२४ पवार व पो.शि. ८४३० यादव यांनी तात्काळ सदर रिक्षाचा योगेश प्रभु यांचे साह्याने स्वारगेट भागात शोध घेतला असता, रिक्षाचालक नामे गणेश पवार याचे रिक्षामध्ये बॅग विसरली असल्याची माहिती मिळुन आली. खडक सी.आर. मोबाईल ही गोटीराम भैय्या चौक येथील पॉईंटवर असल्याने, सदर मार्शल कर्मचारी यांनी नमुद रिक्षाची माहिती खडक सी.आर. मोबाईलवरील कर्मचारी पो.शि. ९९२१ रानगट, म.पो.शि. ९२३९ समिंदर, म.पो.शि. ९९२५ मुळीक यांना सांगितली. त्यानुसार सदर कर्मचारी यांनी नमुद रिक्षा व रिक्षाचालकाचा शोध घेऊन, रिक्षाचालक गणेश पवार यांचे रिक्षामध्ये सदर बॅग मिळुन आली. नमुद कर्मचारी यांनी योगेश प्रभु यांना सदर बॅग सर्व वस्तुंसह ताब्यात देण्यात आलेली आहे.

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

